उत्तर प्रदेश शासन आणिक एक

विरुद्ध

ब्रिजनाथ मिश्रा

२७ मार्च १९९७

[न्यायमूर्ती गण के. रामास्वामी आणि जी. बी. पटनाईक ]

तदर्थ नियुक्तीवरील उत्तर प्रदेश नियमन (सार्वजनिक न्यायालयाच्या कार्यक्षेत्रातील पदांवर) नियम, १९७९ : नियम ४ (३) व ८ सेवा विषयक कायदा - नियुक्ती - सेवा नियमन - प्रतिवादीस तदर्थ नियुक्ती - तदर्थ पदावर नेमण्यात आलेला तदर्थ अधिकारी – कामावर अनधिकृतपणे गैरहजर राहणे – सेवेमध्ये रुजू होण्यासाठी कार्ययोग्य स्वस्थ प्रमाणपत्र सादर करावे आणि अट घालण्यात आली की अनधिकृत गैरजेरीचा कालावधी सेवेमधील खंड मानला जाईल - नियमांनुसार स्थापन करण्यात आलेल्या समितीने प्रतिवादीचे प्रकरण तपासले आणि सेवा नियमनासाठी अयोग्य असल्याचे आढळले - करीता प्रतिवादिस सेवतून बडतर्फ करण्यात आले – त्या बडतर्फीस प्रतिवादीने

रिट याचिके मार्फत उच्च न्यायालयात आव्हान दिले – उच्च न्यायालयाने असे म्हटले की, नंतरची नेमणूक ही नव्याने करण्यात आलेली नियुक्ती आहे आणि त्यामुळे करण्यात आलेली बडतर्फी कायद्याने चुकीची आहे – करिता उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध अपील - नंतर करण्यात आलेली नियुक्ती हा नव्याने नियुक्तीचा आदेश नसून प्रतिवादीला पुन्हा कामावर रुजू होण्यासाठी दिलेली केवळ परवानगी होती – म्हणून कामावर रुजू होताच अनधिकृत गैरहजेरीचा कालावधी सेवतील खंड मानला जाईल या अटीवर अधिनस्त राहून पूर्वी केलेली तदर्थ नेमणूक पुनर्जीवित झाली - सेवेत खंड पडला असला, तरी अशी नियुक्ती नव्याने केलेली नियुक्ती मान्यता येणार नाही – पारित केलेले आदेश ही नियम ८ च्या कक्षेमधे बसतात - त्यामुळे उच्च न्यायालयाचे दृष्टिकोण स्पष्टपणे बेकायदेशीर होता.

दयाल सरन सनन वि. भारत संघ, [१९८०] ३ एससीसी २५ आणि शिव शंकर आणि इतर वि. भारत संघ आणि इतर, [1985] 2 एससीसी 30, संदर्भित.

दिवाणी अपील अधिकार क्षेत्र दिवाणी अपील क्रमांक २७०९ / १९९७.

अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या ६.८.९३ च्या निर्णय व आदेशावरून १९९१ सालच्या च्या रिट याचिका क्रमांक ११२६ मध्ये.

अपीलकर्त्यातर्फे अतिरिक्त महाधिवक्ता राकेश द्विवेदी आणि इरशाद अहमद. प्रतिवादीसाठी पी.डी. शर्मा.

न्यायालयाने खालील आदेश पारित केला:

अनुमति देण्यात आली.

विशेष परवानगीने हे अपील अलाहाबाद उच्च न्यायालय, लखनऊ खंडपीठाने १९९१ च्या रिट याचिका क्रमांक ११२६ मध्ये ६ ऑगस्ट १९९३ रोजी दिलेल्या निकालातून आले आहे.

मान्य केलेली स्थिती अशी आहे की, प्रतिवादीची आयुर्वेदिक वैद्यकीय अधिकारी म्हणून ११ ऑक्टोबर १९८३ च्या कार्यवाहीद्वारे

८५०-१७२० रुपयांच्या वेतनश्रेणीत तदर्थ तत्त्वावर नियुक्ती करण्यात आली होती. पाच वर्षे ते अनधिकृतपणे कर्तव्यावर गैरहजर होते. त्यानंतर त्यांनी १४ एप्रिल १९८९ रोजी केलेल्या अर्जावर ८ सप्टेंबर १९८९ च्या शासन आदेश क्रमांक ५१३३ द्वारे त्यांना कळविण्यात आले की, कर्तव्यावर अनधिकृतपणे गैरहजर राहणे हे सेवेतील खंड मानण्यात यावे, या अटीवर त्यांना कार्ययोग्य स्वस्थ प्रमाणपत्र सादर करून कामावर रुजू होण्याची परवानगी देण्यात आली आहे. असे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर ते पुन्हा कामावर रुजू झाले. त्यानंतर नियम ४ (३) उत्तर प्रदेश तदर्थ नियुक्ती (लोकसेवा आयोगाच्या कार्यक्षेत्रातील पदांवर) नियम १९७९ (थोडक्यात 'नियम') अन्वये निवड समितीची स्थापना करण्यात आली.

तदनंतर या नियमावलीत सुधारणा करण्यात आल्या. नियम ४ नुसार १ जानेवारी १९७७ पूर्वी सरळ तदर्थ तत्त्वावर नियुक्त झालेल्या आणि नियमावली अस्तित्वात येण्याच्या दिनांकपर्यंत म्हणजेच १४ मे १९७९ रोजी सेवेमध्ये अविरत असलेल्या कर्मचारी यांना नियमाच्या शर्तीच्या अधिनस्त राहून सेवा

नियमनाचा लाभ मिळेल. नियम ८ मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, "तदर्थ तत्त्वावर नियुक्त केलेल्या व्यक्तीची सेवा जी योग्य आढळली नाही किंवा ज्याचे प्रकरण नियम ४ (१) मध्ये समाविष्ट नाही अशा व्यक्तीची सेवा ताबडतोब समाप्त केली जाईल आणि अशा समाप्तीनंतर तो कर्मचारी एक महिन्याचे वेतन मिळण्यास पात्र असेल". प्रतिवादीचे प्रकरण २२ जानेवारी १९९१ रोजी समितीसमोर ठेवण्यात आले आणि ते सेवा नियमनसाठी अयोग्य असल्याचे आढळले. त्यानुसार त्यांची नियुक्ती रद्द करण्यात आली. त्याला वर नमूद रिट याचिकेत उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते आणि उच्च न्यायालयाने म्हटले आहे की, ८ सप्टेंबर १९८९ ची नियुक्ती ही नवीन नियुक्ती होती आणि त्यामुळे ही बडतर्फी कायद्याने चुकीची होती. त्यामुळे विशेष परवानगी याचिके मार्फत येथे आव्हान देण्यात आले आहे.

प्रश्न असा आहे - उच्च न्यायालयाचा दृष्टिकोण योग्य आहे का? ८ सप्टेंबर १९८९ च्या आदेशात प्रतिवादीला वैद्यकीय तंदुरुस्ती प्रमाणपत्र सादर करण्याच्या अधीन राहून पुन्हा

कामावर रुजू होण्याची परवानगी देण्यात आली होती, त्याची कर्तव्यावर अनधिकृत अनुपस्थितीमुळे सेवेत खंड पडल्याचे स्पष्ट पणे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे ८ सप्टेंबर १९८९ हा नवीन नियुक्तीचा आदेश नसून प्रतिवादीला आयुर्वेदिक वैद्यकीय अधिकारी म्हणून पुन्हा कामावर रुजू होण्यासाठी दिलेली परवानगी आहे. त्यानंतर वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्यानंतर ते कामावर रुजू झाले. त्यांच्या या पदावर रुजू झाल्यानंतर त्यांचा या पदावरील अधिकार त्यांच्या सुरुवातीच्या नियुक्तीपासून म्हणजे १३ ऑक्टोबर १९८३ रोजी संपुष्टात आला. हेच दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, कर्तव्यावर अनधिकृत पणे गैरहजर राहण्याचा कालावधी सेवेतील खंड मानण्याच्या अधीन राहून त्यांची तदर्थ नियुक्ती पुन्हा सुरू करण्यात आली. दयाळ सरन सनन विरुद्ध भारत संघ [१९८०] २ एससीसी २५ आणि शिव शंकर आणिक एक [1985] 2 एससीसी 30 या खटल्यात या न्यायालयाने दिलेल्या निकालाप्रमाणे सेवेत खंड पडला असला, तरी ही नवीन नियुक्ती मानता येणार नाही.

नियमांतर्गत नेमलेल्या समितीने प्रतिवादीच्या प्रकरणाचा विचार केला होता आणि तो नियमित होण्यास योग्य नसल्याचे आढळले होते, हे लक्षात घेता, बडतर्फीचा आदेश नियमांच्या नियम 8 च्या कार्यकक्षेमद्धे मोडतो. परिणामी, सेवा समाप्तीपूर्वी चौकशी किंवा चौकशी करताना प्रतिवादीला संधी देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यामुळे उच्च न्यायालयाचे याबाबबत व्यक्त केलेले मत स्पष्टपणे बेकायदेशीर आहे.

त्यानुसार अपील मंजूर केले जाते आणि रिट याचिका फेटाळली जाते परंतु, परिस्थितीत, खर्चाशिवाय.

टी.एन.ए. अपील मंजूर .

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा

पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x